महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक :१४४२(२)(३)/२०२१/तेवीस दिनांक : ११ ऑगस्ट, २०२३.

**-:प्रसिध्दीपत्रक :-**

विषय:- महाराष्ट्र दुय्यम सेवा,अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा-२०२१
पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या शारीरिक चाचणीच्या कार्यक्रमाबाबत.
संदर्भ :- १. जाहिरात क्रमांक ४९/२०२२.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि. ०९जुलै, २०२२ (पेपर क्र. १) व दि. १७ जुलै, २०२२ (पेपर क्र. २) रोजी घेण्यात आलेल्या **महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब (मुख्य) परीक्षा-२०२१ (पोलीस उपनिरीक्षक)** चा निकाल दि. २१ नोव्हेंबर, २०२२ रोजी जाहीर करण्यात आला आहे. प्रस्तुत परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या शारीरिक चाचणीचा कार्यक्रम दिनांक ४ सप्टेंबर, २०२३ ते दिनांक ९ सप्टेंबर, २०२३ या कालावधीत राज्य राखीव पोलीस बल, गट-१, रामटेकडी, हडपसर, पुणे येथे घेण्याचे नियोजित असून सदर शारीरिक चाचणीचा कार्यक्रम सोबतच्या परिशिष्ट ‘अ’ व ‘ब’ प्रमाणे घेण्यात येईल. शारीरिक चाचणीचा सविस्तर कार्यक्रम आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर लवकरच जाहिर करण्यात येणार आहे. तरी शारीरिक चाचणीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांनी शारीरिक चाचणीच्या सरावाच्या दृष्टीने कृपया याची नोंद घ्यावी व आवश्यकतेनुसार शारीरिक चाचणीसाठी सराव करावा.

उपसचिव (परीक्षोत्तर) (अ.प.)
ठिकाण : नवी मुंबई. महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

## परिशिष्ट - अ

## पुरुष उमेदवारांकरिता

## महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा - २०२१ (पोलीस उपनिरीक्षक)

**शारीरिक चाचणीमध्ये खालील बाबींचा समावेश असेल :-**

**(१) धावणे** - यासाठी उमेदवारास ८०० मीटर (अर्धा मैल) धावावे लागेल व त्यास खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील :-

| संपूर्ण ८०० मीटरचे अंतर धावण्यास लागणारा कालावधी (मिनिटांमध्ये ) | गुण |
|---|---|
| २.३० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ५० |
| ०२.३० मिनिटांपेक्षा जास्त परंतु ०२.४० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी ................ | ४४ |
| ०२.४० मिनिटांपेक्षा जास्त परंतु ०२.५० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी ................ | ३७.५ |
| ०२.५० मिनिटांपेक्षा जास्त परंतु ०३.०० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी ................ | ३१ |
| ०३.०० मिनिटांपेक्षा जास्त परंतु ०३.१० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी ................ | २५ |
| ०३.१० मिनिटांपेक्षा जास्त परंतु ०३.२० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी ................ | १९ |
| ०३.२० मिनिटांपेक्षा जास्त परंतु ०३.३० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी ................ | १२.५ |
| ०३.३० मिनिटांपेक्षा जास्त | ० |

**उमेदवार ८०० मीटरचे अंतर धावू न शकल्यास त्यास शून्य गुण देण्यात येतील.**

**(२) पुलअप्स -** क्षितिज समांतर खांबावर उमेदवारास आठ पुलअप्स काढावे लागतील. यासाठी एकूण २० गुण देण्यात येतील म्हणजेच एका पुलअपसाठी २.५ गुण राहतील. उमेदवाराची छाती सहजपणे आडव्या खांबाला टेकल्यानंतर त्याने एक पुलअप पूर्ण केला असे समजण्यात येईल असे करताना उमेदवाराने न झगडता आणि / अथवा आपले पाय न झाडता किंवा न वाकवता एक पुलअप पूर्ण केल्यास त्यास पूर्ण २.५ गुण देण्यात येतील. पुलअप काढताना उमेदवारास झगडावे लागले आणि अथवा त्याने आपले पाय झाडले किंवा वाकवले तर एका गुणांपर्यंत गुण कमी होतील. जर उमेदवारास पुलअप काढता आला नाही म्हणजेच त्याला त्याची छाती आडव्या खांबाला टेकवता आली नाही तर त्या पुलअपसाठी त्याला एकही गुण मिळणार नाही.

**(३) गोळा फेक** - उमेदवारास ७.२६० किलोग्रॅम वजनाचा गोळा फेकावा लागेल. गोळाफेकीसाठी खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील :--

| गोळाफेकीचे अंतर (मीटरमध्ये) | गुण |
|---|---|
| ७.५० मीटर किंवा जास्त ................ ................ ................ ................ | १५ |
| ७.०० मीटर किंवा जास्त परंतु ७.५० मीटरपेक्षा कमी ................ ................ | १२.५ |
| ६.५० मीटर किंवा जास्त परंतु ७.०० मीटरपेक्षा कमी ................ ................ | १० |
| ६.०० मीटर किंवा जास्त परंतु ६.५० मीटरपेक्षा कमी ................ ................ | ७.५ |
| ५.५० मीटर किंवा जास्त परंतु ६.०० मीटरपेक्षा कमी ................ ................ | ५ |
| ५.०० मीटर किंवा जास्त परंतु ५.५० मीटरपेक्षा कमी ................ ................ | २.५ |
| ५.०० मीटरपेक्षा कमी | ० |

**(अ)** गोळा फेकताना एक चूक क्षम्य असेल व त्यासाठी गुण कमी करण्यात येणार नाहीत.

**(ब)** गोळाफेकीत फेकलेला गोळा जर सीमांकन रेषेच्या मध्यावर पडला तर उमेदवारास नजीकच्या वरच्या श्रेणीतील गुण दिले जातील. **उदा. जर गोळाफकीचे अंतर ६ मीटर असेल तर उमेदवाराला ७.५ गुण देण्यात येतील.**

**(४) लांब उडी** - यासाठी उमेदवारास धावत येऊन लांब उडी मारावी लागेल. लांब उडीसाठी खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील:-

| उडीचे अंतर | गुण |
|---|---|
| ०४.५० मीटर किंवा जास्त ................ ................ ................ .................... | १५ |
| ०४.३५ मीटर किंवा जास्त परंतु ०४.५० मीटरपेक्षा कमी ................ ................ | १४ |
| ०४.२० मीटर किंवा जास्त परंतु ०४.३५ मीटरपेक्षा कमी ................ ................ | १२ |
| ०३.९० मीटर किंवा जास्त परंतु ०४.२० मीटरपेक्षा कमी ................ ................ | १० |
| ०३.६० मीटर किंवा जास्त परंतु ०३.९० मीटरपेक्षा कमी ................ ................ | ८ |
| ०३.३० मीटर किंवा जास्त परंतु ०३.६० मीटरपेक्षा कमी ................ ................ | ६ |
| ०३.०० मीटर किंवा जास्त परंतु ०३.३० मीटरपेक्षा कमी ................ ................ | ४ |
| ०२.५० मीटर किंवा जास्त परंतु ०३.०० मीटरपेक्षा कमी ................ ................ | २ |
| २.५० मीटरपेक्षा कमी ................ ................ ................ ...................... | ० |

उमेदवारास फक्त एकच उडी मारण्याची परवानगी राहील. उडी मारताना अपघात झाल्यास किंवा चूक, म्हणजे उडी मारण्याच्या रेषेवर किंवा रेषेपलीकडे पहिले पाऊल टाकल्यास उमेदवारास एक जादा संधी देण्यात येईल व त्यासाठी गुण कमी केले जाणार नाहीत. जादा संधीचा फ़ायदा घेताना पुन्हा चूक केल्यास वा अपघात घडल्यास उमेदवारास शून्य गुण देण्यात येतील.

**टीप :- (१)** वरील चाचणी प्रकारच्या सरावासाठी उमेदवारांना राज्यातील पोलीस कवायत मैदानाचा उपयोग करता येईल. तसेच त्यांना पोलीस निदेशकाची मदत देण्यात येईल. परंतु यासाठी मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर येथील पोलीस उप आयुक्त, पोलीस मुख्यालय आणि जिल्ह्याच्या ठिकाणी पोलीस अधीक्षक कार्यालयाशी संपर्क साधावा.

**(२)** शारीरिक चाचणीत उत्तीर्ण होण्यासाठी किमान ६० टक्के गुण (म्हणजे ६० गुण) मिळणे आवश्यक आहे. तसेच या गुणांचा अंतिम गुणवत्तेकरिता विचार होणार नाही.

**(३)** सर्व शारीरिक चाचणीत एकूण गुणांची बेरीज अपूर्णांकात असल्यास ती अपूर्णांकातच ठेवून, शारीरिक चाचणीचा निकाल तयार करण्यात येईल.

*-*-*-*-*

**परिशिष्ट - ब**

**महिला उमेदवारांकरिता**

**महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा - २०२१ (पोलीस उपनिरीक्षक)**

**शारीरिक चाचणीमध्ये खालील बाबींचा समावेश असेल :-**

**(१) धावणे** - यासाठी उमेदवारास ४०० मीटर अंतर धावावे लागेल व त्यास खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील :-

| संपूर्ण ४०० मीटर अंतर धावण्यास लागणारा कालावधी (मिनिटांमध्ये ) | गुण |
|---|---|
| ०१.१५ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ५० |
| ०१.१५ मिनिटांपेक्षा जास्त परंतु ०१.२० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ४४ |
| ०१.२० मिनिटांपेक्षा जास्त परंतु ०१.२५ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ३८ |
| ०१.२५ मिनिटांपेक्षा जास्त परंतु ०१.३० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | ३२ |
| ०१.३० मिनिटांपेक्षा जास्त परंतु ०१.३५ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | २६ |
| ०१.३५ मिनिटांपेक्षा जास्त परंतु ०१.४० मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | २० |
| ०१.४० मिनिटांपेक्षा जास्त परंतु ०१.४५ मिनिटे किंवा त्यापेक्षा कमी | १४ |
| १.४५ मिनिटांपेक्षा जास्त..... | ० |

**(२) लांब उडी** - यासाठी उमेदवारास धावत येऊन लांब उडी मारावी लागेल व त्यास खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील :-

| लांब उडीचे अंतर (मीटरमध्ये) | गुण |
|---|---|
| ०४.०० मीटर किंवा जास्त | ३० |
| ०३.८० मीटर किंवा जास्त परंतु ०४.०० मीटरपेक्षा कमी | २८ |
| ०३.६० मीटर किंवा जास्त परंतु ०३.८० मीटरपेक्षा कमी | २४ |
| ०३.४० मीटर किंवा जास्त परंतु ०३.६० मीटरपेक्षा कमी | २० |
| ०३.२० मीटर किंवा जास्त परंतु ०३.४० मीटरपेक्षा कमी | १६ |
| ०३.०० मीटर किंवा जास्त परंतु ०३.२० मीटरपेक्षा कमी | १२ |
| ०२.८० मीटर किंवा जास्त परंतु ०३.०० मीटरपेक्षा कमी | ८ |
| ०२.५० मीटर किंवा जास्त परंतु ०२.८० मीटरपेक्षा कमी | ४ |
| ०२.५० मीटरपेक्षा कमी...... | ० |

उमेदवारास फ़क्त एकच उडी मारण्याची परवानगी राहील. उडी मारताना अपघात झाल्यास किंवा चूक, म्हणजे उडी मारण्याच्या रेषेवर किंवा रेषेपलीकडे पहिले पाऊल टाकल्यास उमेदवारास एक जादा संधी देण्यात येईल व त्यासाठी गुण कमी केले जाणार नाहीत. जादा संधीचा फ़ायदा घेताना पुन्हा चूक केल्यास वा अपघात घडल्यास उमेदवारास शून्य गुण देण्यात येतील.

**(३) गोळा फेक** - उमेदवारास ४ किलो वजनाचा गोळा फेकावा लागेल. गोळाफेकीसाठी खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील :-

| गोळाफेकीचे अंतर (मीटरमध्ये) | गुण |
|---|---|
| ६.०० मीटर व त्यापेक्षा जास्त......................... ......... ....................... | २० |
| ५.५० मीटर व त्यापेक्षा जास्त —६.०० मीटरपेक्षा कमी......... ....................... | १७ |
| ५.०० मीटर व त्यापेक्षा जास्त — ५.५० मीटरपेक्षा कमी......... ....................... | १४ |
| ४.५० मीटर व त्यापेक्षा जास्त — ५.०० मीटरपेक्षा कमी......... ....................... | ११ |
| ४.०० मीटर व त्यापेक्षा जास्त — ४.५० मीटरपेक्षा कमी......... ....................... | ८ |
| ४.०० मीटरपेक्षा कमी ......... ....................... ......... ....................... .... | ० |

**(अ)** गोळा फेकताना एक चूक क्षम्य असेल व त्यासाठी गुण कमी करण्यात येणार नाहीत.

**(ब)** गोळाफेकीत फेकलेला गोळा जर सीमांकन रेषेच्या मध्यावर पडला तर उमेदवारास नजीकच्या वरच्या श्रेणीतील गुण दिले जातील. उदा. **जर गोळाफेकीचे अंतर ५ मीटर असेल तर उमेदवाराला १४ गुण देण्यात येतील.**

**टीप:-** (१) वरील चाचणी प्रकारच्या सरावासाठी उमेदवारांना राज्यातील पोलीस कवायत मैदानाचा उपयोग करता येईल. तसेच त्यांना पोलीस निदेशकाची मदत देण्यात येईल. परंतु यासाठी मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर येथील पोलीस उप आयुक्त, पोलीस मुख्यालय आणि जिल्ह्याच्या ठिकाणी पोलीस अधीक्षक कार्यालयाशी संपर्क साधावा.

(२) शारीरिक चाचणीत उत्तीर्ण होण्यासाठी किमान ६० टक्के गुण (म्हणजे ६० गुण) मिळणे आवश्यक आहे. तसेच या गुणांचा अंतिम गुणवत्तेकरिता विचार होणार नाही.

(३) सर्व शारीरिक चाचणीत एकूण गुणांची बेरीज अपूर्णांकात असल्यास ती अपूर्णांकातच ठेवून, शारीरिक चाचणीचा निकाल तयार करण्यात येईल.